# नाशिक महानगरपालिका,नाशिक
# सार्वत्रिक निवडणूक सन २०१७
## मतदार यादीबाबत जाहिर सूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७अ मधील तरतूदीनुसार आणि मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४८/का.५ दिनांक २२/११/२०१६ अन्वये नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता मतदार यादी अंतिम करुन प्रसिध्द करणेबाबत कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार नाशिक महानगरपालिकेने १२३ नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघ, १२४, नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघ, १२५, नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघ आणि १२६, देवळाली विधानसभा मतदारसंघाच्या दिनांक ५/१/२०१७ या अधिसूचित दिनांकाच्या मतदार याद्यांवरुन नाशिक महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता निश्चित केलेल्या ३१ बहुसदस्यीय प्रभागांकरीता नाशिक महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या मतदार याद्या प्रभागनिहाय विभागून प्रारुप मतदार याद्या सर्व नागरिकांच्या पहाणीसाठी खालील ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १) | राजीव गांधी भवन, मनपा मुख्यालय, शरणपूररोड, नाशिक | १ ते ३१ |
| २) | विभागीय कार्यालय, नाशिक पूर्व, मेनरोड, नाशिक | १४, १५, १६, २३ व ३० |
| ३) | विभागीय कार्यालय, नाशिक पश्चिम, पंडीत कॉलनी, नाशिक | ७, १२ व १३ |
| ४) | विभागीय कार्यालय, पंचवटी, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक | १ ते ६ |
| ५) | विभागीय कार्यालय, नाशिकरोड, दुर्गा गार्डन शेजारी, नाशिकरोड | १७, १८, १९, २०, २१ व २२ |
| ६) | विभागीय कार्यालय, नविन नाशिक, अंबड पोलिस स्टेशन समोर, सिडको, नाशिक | २४, २५, २७, २८, २९ व ३१ |
| ७) | विभागीय कार्यालय, सातपूर, त्र्यबंकरोड, सातपूर, नाशिक | ८, ९, १०, ११ व २६ |

त्यानुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विधानसभा मतदार संघाच्या मतदार याद्या प्रभागनिहाय विभागून प्रारुप मतदार यादी तयार करण्यात आलेली असून, सदरची मतदार यादी विभागतांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत मा.राज्य निवडणुक आयोगाच्या सुचना आहेत.

१. मा.राज्य निवडणुक आयुक्तांनी अधिसूचीत केलेल्या तारखेस व अस्तित्वात असलेली संबंधीत क्षेत्राची मतदार यादी जशी असेल तशी संबंधीत प्रभागामध्ये विभागणेची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे वाढविणे, कमी करणे, त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादींची अनुमती देण्यात आलेली नाही.

२. मतदार यादी विभागण्याचे काम हे कट ॲण्ड पेस्ट स्वरुपाचे असून, विधानसभा मतदार यादीच्या कोणत्याही भागात बदल करता येणार नाही.

विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीत नावे असतांनाही प्रभागाच्या मतदार यादीत नावे वगळली गेल्यास अथवा दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंर्तभूत झाल्यास अथवा चुकीची छपाई झाल्यास नावांबाबत झालेली चुक लेखी निदर्शनास आणून दिल्यास अशा योग्य हरकतींची व सुचनांची दखल घेतली जाईल.

सदर मतदार यादयांबाबत नागरिकांच्या हरकती व सूचना कार्यालयीन वेळेत मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, नाशिक व महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयात लेखी स्वरुपात दिनांक १२/०१/२०१७ ते दिनांक १७/०१/२०१७ पर्यंत सादर कराव्यात. मुदतीनंतर दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. प्राप्त हरकती व सुचनांवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम यादी दिनांक २१/०१/२०१७ रोजी अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात येईल.

ठिकाण : नाशिक
दिनांक : १२/०१/२०१७

Sd/-
**(विजय पगार)**
**प्राधिकृत अधिकारी(निवडणूक)व उपआयुक्त(प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

Sd/-
**(अभिषेक कृष्णा)**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**